# अहमदनगर महानगरपालिका
# क्रीडा व सांस्कृतिक विभाग

**रचना :-**

| अ.क्र. | अधिकारी व क्रीडा वर्ग |
|---|---|
| १ | मा. आयुक्त तथा अध्यक्ष महानगरपालिका क्रीडा समिती |
| २ | मा. उपायुक्त [ कर ] |
| ३ | क्रीडा विभाग प्रमुख |
| ४ | क्रीडा विभाग लिपीक |
| ५ | शिपाई - १, बिगारी - ३ |

**विभागाकडील योजनांचा तपशील :-**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उपक्रमाबाबत थोडक्यात तपशील |
|---|---|---|
| १ | शालेय क्रीडा स्पर्धा भरविणे. | क्रीडा स्पर्धा आयोजनाबाबतच्या शासन निर्णयानुसार सन २००३-०४ पासून प्रती वर्षी अहमदनगर मनपा व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिका जिल्हा स्तर शालेय क्रीडा स्पर्धा व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असून आगामी वर्ष सन २०१८-१९ मध्येही सदर क्रीडा स्पर्धा कार्यक्रमाचे आयोजन करणे आहे. यामध्ये शासनमान्य व क्रीडा संघटनेकडील असे एकूण ८० विविध खेळांचे सामने भरविण्यात येणार आहेत. |
| २ | क्रीडा साहित्य खरेदी | सदर योजने अंतर्गत महानगरपालिका हद्दीतील मनपा व्यायामशाळांना संबंधित प्रभागातील माननीय नगरसेवक /नागरीकांच्या मागणीनुसार व प्रभाग समिती कार्यालयाच्या शिफारशीनुसार आधुनिक व्यायाम साहित्य उपलब्ध करुन देण्याची योजना आहे. |

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उपक्रमाबाबत थोडक्यात तपशील |
|---|---|---|
| ३ | क्रिडांगण विकसीत करणे | या योजने अंतर्गत मनपा नगररचना विभागाच्या अभिप्रायानुसार महानगरपालिका हद्दीतील खुल्या जागा [ओपन स्पेस ] मध्ये विविध खेळांच्या प्रमाणात क्रिडांगणे विकसीत करणे व त्या दृष्टीकोनातून - १] क्रिडांगण समपातळीत आणणे २] धावण मार्ग तयार करणे, ३]क्रिडांगणास कुंपण घालणे, ४] विविध खेळांची प्रमाणित क्रिडांगणे तयार करणे ५] क्रिडांगणाच्या ठिकाणी पाण्याची व इतर सुविधा तयार करणे इ.कामे करणे प्रस्तावित आहे. |
| ४ | महापौर चषक स्पर्धा | क्रीडा विकासात महानगरपालिकेचा सहभाग असावा या दृष्टीकोनातून सदर योजने अंतर्गत मा. मनपा पदाधिकारी व प्रशासकीय स्तरावर ठरविण्यात आलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार विविध खेळांच्या जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तर क्रीडा स्पर्धांचे आयोजन विविध एकविध खेळांच्या संघटनेच्या सहकार्याने अथवा संयुक्त विद्यमाने करणे प्रस्तावित आहे. |
| ५. | सांस्कृतिक कार्यक्रम घेणे | सदर उपक्रमाअंतर्गत दि. ३० जून २०१८ रोजी मनपा वर्धापन दिनानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करणे, तसेच प्रतिवर्षाप्रमाणे महानगरपालिका हद्दीतील गणेश मंडळांच्या देखावे स्पर्धा २०१८ चे आयोजन करणे प्रस्तावित आहे. |
| ६. | मिशन ऑलिंपीक चँपीयन ऐवजी मिशन नॅशनल चँपीयन योजना | सदर योजना मनपामार्फत राबविण्याबाबतच्या नगरविकास विभागाच्या अर्धशासकीय पत्रानुसार मिशन ऑलिपींक चँपीयन योजना राबविण्याकरीता सर्वसाधारण पणे एका खेळासाठी एका वर्षी ३० ते ४० लाख रुपये |

| | | |
|---|---|---|
| | राबविणे | इतका मोठा खर्च अपेक्षीत असून राज्यातील मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर आदी महापालिकांना एवढा मोठा निधी उपलब्ध करुन देणे कठीण जाणार नाही.<br>तथापि अहमदनगर महानगरपालिकेस एवढा मोठा निधी उपलब्ध करुन देणे शक्य नाही. तरी या योजने अंतर्गत असणारी " **मिशन नॅशनल चँपियन** " ही द्वितीय योजना अहमदनगर मनपा मार्फत राबविणे योग्य राहिल. |

**जनमाहिती अधिकारी यांची नावे व पदनामे :-**

१] जनमाहिती अधिकारी :- क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर [ पद रिक्त]

२] सहाय्यक माहिती अधिकारी :- फिलीप्स व्ही.टी.
लिपीक, क्रीडा व सांस्कृतिक विभाग,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर